सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

ज्ञानगंगा घरोघरी

Ph. :0253-2230580, http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac

नोंदणी कक्ष

जा.क्र. : नोंदणी/2020/ 208

दिनांक : 25.11.2020

# सूचनापत्र – १६

## प्रथम वर्ष एम.बी.ए. (P79) शिक्षणक्रम प्रवेश

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सन 2020-21 या शैक्षणिक वर्षातील एम.बी.ए. (प्रथम वर्ष) शिक्षणक्रमाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दिनांक 15 ऑक्टोबर 2020 पासून सुरु झालेली होती. संपूर्ण महाराष्ट्र राज्यभर सुरु असलेल्या "कोरोना" (कोव्हीड 19) या विषाणूच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर AICTE ने निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार एम.बी.ए. शिक्षणक्रमाचे प्रवेश प्रवेशपरीक्षेविना देण्याचे निर्देशित केलेले आहे. त्यानुसार मुक्त विद्यापीठाच्या प्रथम वर्ष एम.बी.ए. (P79) शिक्षणक्रमास विना प्रवेशपरीक्षेशिवाय प्रवेश घेता येईल. सदर प्रवेश दिनांक 30 नोव्हेंबर 2020 सुरू राहणार आहेत. त्यासाठी खालील सूचनांचे पालन संबंधित उमेदवारानी करावयाचे आहे.

१. ज्या उमेदवाराने प्रवेशपरीक्षेचे शुल्क भरले आहे परंतु प्रवेशपरीक्षा दिलेली नाही. अशा उमेदवारांना त्यांच्या पदवी परीक्षेच्या गुणांचे निकष पूर्ण करीत प्रथम वर्षासाठी प्रवेश घेता येईल. अशा उमेदवारांनी त्यांचा युजर आयडी आणि पासवर्ड वापरून प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.
२. ज्या उमेदवाराने प्रवेशपरीक्षा दिलेली आहे. परंतु त्यात पात्र झालेले नाही. असे सर्व उमेदवार त्यांच्या पदवीच्या गुणांचे निकष पूर्ण करून प्रथम वर्ष प्रवेशास पात्र असतील. अशा उमेदवारांनी त्यांचा युजर आयडी आणि पासवर्ड वापरून प्रथम वर्ष प्रवेशप्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.
३. ज्या उमेदवाराने प्रवेशपरीक्षा दिलेली आहे परंतु परीक्षेतील गैरप्रकार किंवा अन्य कारणामुळे पात्रता यादीत नाव आले नाही अशा सर्व उमेदवारांना प्रथम वर्षासाठी प्रवेश घेता येईल. अशा उमेदवारांनी त्यांचा युजर आयडी आणि पासवर्ड वापरून प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.
४. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष एम.बी.ए. शिक्षणक्रमासाठी असणारी प्रवेशपरीक्षा यापुढे द्यावी लागणार नाही. पदवी परीक्षेच्या गुणांचे निकष पूर्ण करणारे उमेदवार प्रथम वर्ष एम.बी.ए. शिक्षणक्रम प्रवेशासाठी पात्र राहतील.
५. ज्या उमेदवाराने प्रवेश परीक्षा अर्ज भरतांना त्यांच्या पदवी परीक्षेसंबंधी Appearing अशी नोंद केली आहे. अशा उमेदवाराने त्यांच्या पदवी परीक्षेच्या उत्तीर्णतेची टक्केवारी आणि पदवी परीक्षा उत्तीर्णतेचे गुणपत्रक अपलोड करावयाचे आहे. यासाठी त्यांनी आपल्या युजर आयडी आणि पासवर्डचा वापर करून पदवी परीक्षेच्या गुणांची टक्केवारी अद्ययावत करून गुणपत्रक अपलोड करावयाचे आहे.
६. आवश्यक कागदपत्रे अपलोड व अभ्यासकेंद्राची निवड करून आपला प्रवेश अर्जास अभ्यासकेंद्राची मान्यता (Study Centre Approval) करून घ्यावयाचे आहे. त्यासाठी अभ्यासकेंद्राशी ऑनलाईन पद्धतीने संपर्क साधावा. आपले अभ्यासकेंद्र प्रवेश अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची पडताळणी करून आपल्या प्रवेशास मान्यता देईल.

७. अभ्यासकेंद्राने आपल्या प्रवेशास मान्यता दिल्यानंतर (Study center Approval) विद्यार्थ्याने आपल्या लॉगीनमध्ये Pay your fee या Link ला Click करुन Proceed to Payment या बटनाला Click करुन Fee paid करावी.
८. विद्यापीठाचे शुल्क भरल्यानंतर अभ्यासकेंद्र शुल्क अभ्यासकेंद्राच्या सुचनेनुसार भरावे.
९. ही सर्व प्रक्रिया विद्यार्थ्यांने Online करावयाची असल्याने विद्यार्थ्यांने अभ्यासकेंद्रावर जाण्याची आवश्यकता नाही. अभ्यासकेंद्र शुल्क हे अभ्यासकेंद्राशी संपर्क करुन BHIM, UPI किंवा इतर साधनाचा वापर करुन अदा करावे.

कृपया, काळजी घ्या. सरक्षित राहा.

(श्रीमती. वंदना झेंडे)
सहायक कुलसचिव,
नोंदणी कक्ष, वि.से.वि.

(डॉ. प्रकाश देशमुख)
संचालक,
विद्यार्थी सेवा विभाग.